सेवाप्रवेश नियम
पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून
निम्न संवर्गात/सेवेत/श्रेणीत किमान
सेवेसंबंधीची अट विहित करणे.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०८८/१०८/बारा.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २५ ऑगस्ट १९८८.

CR1988082501

पहा- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१२७७/१
दिनांक १४ ऑक्टोबर १९७७.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१२७७/
दिनांक ३ सप्टेंबर १९७९.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८०/१२
दिनांक २० जुलै १९८१.

परिपत्रक-

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८०/१२ दिनांक २० जुलै, १९८१ व्दारे पदोन्नती करताना निम्न संवर्गात ३ वर्षाच्या किमान सेवेची अट विहित करण्यात आलेली आहे. तथापि ही अट आंतरश्रेणी पदोन्नतीच्या बाबतीत लागू नाही. आंतरश्रेणी पदोन्नतीच्या बाबतीत सुध्दा निम्न पदावर किमान सेवेची अट लागू करता येईल किंवा कसे हा प्रश्न शासनाच काही काळ विचाराधीन होता. या प्रश्नावर सम्यक विचार करुन शासन आता असे आदेश देत आहे की, वर्ग-३ मधून वर्ग ३ मधील वरिष्ठ पदांवर, वर्ग-२ मधून वर्ग-२ मधील वरिष्ठ पदांवर आणि वर्ग-१ मधील दुसऱ्या पदोन्नतीपर्ध पदांवर पदोन्नती करतानाही निम्न पदावर ३ वर्षाच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून विहित करण्यात यावी. (तसेच आंतरश्रेणीय पदोन्नतीसाठी निकटतम निम्न पदावर ३ वर्षाच्या किमान सेवेची अट विहित करण्यात यावी.)

२. मंत्रालयाच्या विविध विभागांनी आपापल्या कक्षेतील पदांच्या संदर्भा वरील तत्व संबंधित सेवाप्रवेश नियमांत अंतर्भूत करण्याची कार्यवाही करावी आणि अशा प्रकारे कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत पदोन्नती करता या तत्वाचा अवलंब करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
[म. त. सोकाशी]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रती-सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई, मंत्रालयाचे सर्व विभाग
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या
नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख.

---

क्र. आस्था ३७/ई-४/८८
पुणे, दिनांक २९.९.१९८८

उपसंचालक भूमि अभिलेख पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/नासिक/मुंबई यांचेकडे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म. रा.] पुणे यांचेकरिता.

प्रत- कार्यासन अधिकारी ई-२/ई-५ यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.
प्रत- अभिलेखापाल.